Peer Reviewed
ISSN 2454-8332

# IMPACT FACTS

Quarterly- Vol.4 • Issue 1 • 15 Sept. - 14 Dec. 2018 • Rs.100/-

*International*
*Interdisciplinary Multilingual Research Journal*

**Editor**
**Dr. Kailas G.Kaninde**

# INDEX


| SR. NO. | PAPER TITLE | AUTHOR NAME | PAGE NO. |
|---|---|---|---|
| 01 | ROLE OF INFORMATION AND COMMUNICATION TECHNOLOGY (ICT) IN HIGHER EDUCATION FOR QUALITY IMPROVEMENT | Dr. Kailas Kaninde | 01 |
| 02 | Role of ICTs in Pedagogy for Quality Teaching Learning | Dr.S.S.Jadhav | 04 |
| 03 | Theme of Marriage, love and sex in Girish Karnad's '*Naga-Mandala*' | Dr. Chandrakant R. Mandlik | 10 |
| 04 | Impact of Digitalization on the Indian Economy and Requirement of Financial Literacy | Prof. Pilgulwar P. B. | 14 |
| 05 | The problems of Girl's Education in Tribal Area. | Assit. Prof. Thorat Manohar Pundlik | 18 |
| 06 | Critical Issues of Rohingya and Humanitarian aspects of Indian Refugee Policy | Kumare Laxman N. | 21 |
| 07 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आरक्षणविषयक भूमिका** | प्रा.डॉ. दत्ताजी हुलप्पा मेहत्रे | 28 |
| 08 | मथुरा लभान समाज संस्कृती व सद्यस्थिती - एक चिकित्सक अभ्यास | प्रा. मनोहर कुंडलीक थोरात | 31 |
| 09 | निषेध नको, सांघिक लढा द्या ! हिच खरी डॉ.बाबासाहेबांना आदरांजली ठरेल ! | प्रा. उज्जैनकुमार विठ्ठलराव पाईकराव | 34 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रामस्वामी पेरियार यांची बौध्दीक मैत्री | प्रा. थोरात एम. बी. | 38 |
| 11 | कातकरींची नृत्यकला | प्रा.मारोती जी. लोणे | 42 |
| 12 | व्यक्तिमत्व: वैशिष्ट्यांचे संघटन | समिना ईब्राहिम पठाण | 46 |
| 13 | रविकिरण मंडळातील कवींच्या काव्याची समीक्षा | प्रा.डॉ. जाधव ज.तु. | 51 |

# रविकिरण मंडळातील कवींच्या काव्याची समीक्षा

**प्रा.डॉ. जाधव ज.तु.**
मराठी विभाग,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,भोकर जि.नांदेड

## प्रस्तावना :–

प्रा. मायदेवांनी 1920 साली तांब्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला आणि 1923 मध्ये रविकिरण मंडळाची स्थापना झाली. काव्याच्या क्षेत्रात भरीव काम करण्याच्या अनुषंगाने या मंडळाची स्थापना झाली असून नाविन्यपूर्ण व प्रयोगाभिलाषी कविंच्या अस्तित्वामुळे अंर्तबाह्य नवीन वळण लावण्याच्या अभिलालशेने रविकिरण मंडळाचे महत्त्व अनन्य आहे. रा. श. वाळिंबे म्हणतात, "समाजातील अन्यायाविरुद्ध वैषम्याविरुद्ध बंड पुकारण्याची जिद्द कवींमध्ये संचारली होती. रविकिरण मंडळातील कविंचे बंड सबंध समाज नवीन पायावर उभारण्याच्या उत्कट इच्छेतून निर्माण झालेले असून एका व्यक्तिच्या व्यथांचा परिहार करणे हा त्यात हेतू नव्हता."[1] कविंच्या आत्यंतिक तादात्म्याची ती गुंज होती. उत्स्फूर्ततेपेक्षा रेखीवपणा आणी नजाकत या बाबींकडे रविकिरण मंडळातील कविंचा रोख होता. कलाकुसरीचे गुण रविकिरण मंडळातील सर्व कविंच्या काव्यात प्रकर्षाने जाणवत होते असे नाही तर काही कविंची कविता क्षीण आणि उत्कट स्वरूपाचीही जाणवत होती. याही पलिकडे जावून अभ्यास केला असता काहींची कविता कृत्रिम आणि पंडिती असल्याचे जाणवते. क्षीरसागरांनी रविकिरण मंडळाच्या सदीचा काळ हा **(Decadence of Romanticism)** मानतांना दिसतात. खरे तर रविकिरण मंडळातील हे कवी तांब्यांच्या गीत परंपरेकडे, अभिजातवादी परंपरेकडे अधिक झुकलेले होते.

1923 ते 1935 च्या कालखंडात रविकिरण मंडळाला उधान आले होते. रविकिरण मंडळाचा परामर्ष घेतांना म.वि. राज्याध्यक्ष म्हणतात, "1920 ते 1930 हा काळ रविकिरण मंडळाच्या उत्कर्षाचा काळ होय. काही कवी एकत्र आले व त्यांनी कवितेचा संबंध दैनंदिन जीवनाशी लावून तिचे स्वरूप सुधारण्याचा प्रयत्न केला. कविता अधिक वास्तव करण्याची त्यांची भूमिका होती."[2] बहिरंगाच्या आस्थेतून रविकिरण मंडळाने रचनाविषयक प्रयोग करून कवितेच्या बाहयस्वरुपात विविधता आणली हेच यशस्वीतेचे गमक म्हणावे लागेल. या कविंमध्ये यशवंतांना सर्वाधिक अधिक लोकप्रियता मिळाली होती. त्यांच्या निराशेतून व व्यथांमधून जणू सामान्य माणसांच्या व्यथांना वाचा फुटली.

कवी गिरीश यांनी कवितेला गोंडस शब्दरूप देऊन त्याविषयी तितकेच गोंडस निष्कर्ष काढले होते. माधव ज्यूलीयन यांच्या आरंभीच्या प्रेमगीतांना एक वेगळा दरवळ आहे. तो सुगंध काही प्रमाणात फारसी गजलांनी दिला होता. पुढे ते परंपरानिष्ठ 'पंडित–कवी' बनले. झेंडुची फुले 1925 यातून तल्लकवींची सुरेख विडंबने निर्माण झालीत.[3] रविकिरण मंडळातील कविंनी मराठी कवितेला नवे वळण लावले. मराठी कवितेची भाषा, तिची जडणघडण निसर्गाकडे आणि जीवनाकडे पाहण्याची तिची दृष्टी, प्रणयभावनांचा अविष्कार करण्याची तिची शक्ती या सगळ्याच गोष्टींना कविंनी निःसंशय वेगळे वळण लावले. कवी बा. सी.

मर्ढेकरांनीही त्यांचे कर्तृत्व मान्य केलेले आहे. कविवर्य यशवंतांनी आपली विलक्षण उज्वल कल्पनाशक्ती, देशाभिमानाची ओत, इतिहासाचा जाज्वल्य अभिमान शैली, तसेच कोणताही करुणाभाव काळजाला हात घालीन अशा शब्दात प्रकट करण्याची हातोटी या गुणांमुळे त्या काळातील हजारो श्रोत्यांना अक्षरशः मंत्र मुग्ध करून टाकले होते.

कवी गिरीशांनी आधुनिक कवितेला रसमधुर चाली देऊन आणि चित्रमय वर्णने करून कवितेत, गेयता आणि नादमाधुर्य प्राप्त करून दिले. वि. द. घाटेंनी कवितेला शाहीरी ढंग चढवून जवानीचा जोश तसेच मोजक्या शब्दातून जागविलेला उत्कट भाव वर्णन करण्याची हतोटी या गुणांनी एक निराळाच साज मराठी कवितेला चढविला. रानडे यांनी मोजकीच कविता लिहिली असली तरी अंतर्मुखता आणि प्रीतीभावनेचे मार्दव नाजुकपणाने व्यक्त झाली आहेत. झेंडुच्या फुलांच्या विकासातून विडंबन कवितांमुळे आधुनिक कवितेच्या वातावरणातील बुवाबाजी, घमेंड, दंभ, मक्तेदारी इ. गोष्टींचा नायनाट झाला. झेंडुच्या फुलांमुळे रविकिरण मंडळाची लोकप्रियता वाढली. केशवसुत, गडकरी यांच्यापेक्षा काहीतरी वेगळे करून दाखविण्याची जिज्ञासा या मंडळाच्या कविंमध्ये निर्माण झाली.

"मराठी कवितेच्या प्रगतिच्या दृष्टीने पहिली कलाटणी रविकिरण मंडळानेच दिली. ही सर्वात महत्त्वाची घटना होय."[४] ग. त्र्यं. मांडखोलकरांचे प्रतिपादन काही सत्य घटनांवर प्रकाश टाकीत असले तरी रविकिरण मंडळाचे कौतुक करण्याची आणि मर्ढेकरांशी मंडळाच्या कार्यकर्तृत्वाचा संबंध जोडून मंडळाचे मोठेपण विशद करण्याची प्रवृत्ती त्यात निश्चीतच आहे. मंडळातील माधव ज्युलियन, गिरीश आणि यशवंत या कवि मित्रांनी अव्याहत काव्यलेखन करून रविकिरण मंडळाला मोठे केले. काव्यशास्त्र विनोदाच्या चर्चेतून व चहापानाच्या कार्यक्रमातुन सन्डे टी क्लबचा जन्म झाला. पुढे 1923 रविकिरण मंडळ असे नाव प्रसिद्ध झाले. रविकिरण मंडळाने स्फुट आणि दीर्घ काव्य देऊन मराठीचा अभिमान जागविला आहे.

प्रा. अनुराधा पोतदार म्हणतात, "कविता हा मानवाच्या अस्तित्वाचाच एक निरंतर व अपरिहार्य असा उद्‌गार असतो. रविकिरण मंडळातील कविंची कविता ही सामान्यांच्या भावनांना शब्दरूप देणारी कविता आहे. तिचे अखेरचे मूल्यमापन मात्र ती कोणत्या अस्मितेचे दर्शन घडवते यात नसून ते कसे घडवते यातच आहे."[५] गडकऱ्यांच्या आत्मप्रत्ययाने रसरसलेली प्रेमगीते त्यांचे मर्मस्थळ असून त्यांच्या भाषासौंदर्यामुळेच वाचक गुंगून गेले होते. याच काळात दैनंदिन जीवनातील अत्यंत भावछटा यशवंत, गिरीश, माधव जूलियन, श्री. बा. रानडे आणि मनोरमा रानडे यांच्या काव्यातूनच वाचकांना जनाजवळया आपल्याशा झाल्या होत्या.

श्री. के. क्षिरसागरांनी म्हंटल्याप्रमाणे, "जे स्वीकारायचे धैर्य जीवनाला आलेले नसते ते प्रथम वाङ्‌मयातून डोकावू लागते या न्यायानेच आधुनिक शिक्षणाच्या सुधारणेचा स्पर्श झालेल्या जीवनातील अनुभवात रसिकतेने साथ देणारी स्त्री, तिच्या विषयांचे आकर्षण, सहजीवनाची स्वप्न, भावनेची चारुता, कौटुंबिक जीवनातील सुखदुःखांची संगत या साऱ्यांचेच दर्शन मध्यमवर्गीय तरुण पिढीला रविकिरण मंडळाने करून दिले.

रसिकांच्या कानामनात निनादत राहणाऱ्या भावगीतातून अनुभवाचे हे बोल त्यांच्या अंतःकरणात शिरले मंडळाने गाजविलेल्या काव्यगायनाच्या मैफलितून ह्या कवितांचा प्रसार अल्पावकाशात झाला. प्रेमविषयाची कक्षाही त्यामधून रुंदावत गेली. किरण, उषा, प्रभा या आरंभीच्या संग्रहातूनही या वैचित्र्यांची नव्हे

तर भावसौंदर्याचीही प्रचिती आजही येते."[६] अर्थात हेच रविकिरण मंडळाची मोठी देणगी नव कविंना मिळालेली आहे. यातून अन्यायाचे गाऱ्हाने मांडणारी प्रवृत्ती निर्माण झाली. पद्यपक्तीची तरफ किती सामर्थ्यशाली आहे. याची बुज रविकिरण मंडळातील कवींनी प्रकर्षाने तेवत ठेवली आहे.

संदर्भ:–


१) 'युगवाणी' दिवाळी अंक, १९७४ पृ. क.२१२

२) अ. के. भागवत, टागोर–साहित्य–कला विचार, पृ.क. १५५–१५६

३) उनि, पृ.क. १५८

४) म. सा. पत्रिका, साहित्यसाधना, पृ. क्र. ८

५) म. सा. पत्रिका, ऑगस्ट १९६३, पृ. क्र. 34

६) साहित्यसमीक्षा, वि. वा. शिरवाडकर गौरवग्रंथ, पृ. क्र. ११३